# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: २३ एप्रिल, २०२२

---

जळगाव दि.२३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील व संलग्नित महाविद्यालयातील एकूण नऊ विद्यार्थी व शिक्षक यांना गेल्या पाच वर्षातील राष्ट्रीय सेवा योजनेत भरीव कामगिरी केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाकडून जाहिर झालेल्या पुरस्कारांचे वितरण मुंबई येथे एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठात मंगळवार दि.२५ एप्रिल रोजी होणार आहे.

वर्ष २०१६-१७ पासून २०२०-२१ या पाच वर्षांच्या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजनेत निस्वार्थ भावनेने व निष्ठेने समाजासाठी कार्य करणाऱ्यांना महाराष्ट्र शासनाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांनी विविध पुरस्कार जाहिर केले आहेत. या पुरस्कारांमध्ये विद्यापीठातील व संलग्नित महाविद्यालयातील पुढील विद्यार्थी व शिक्षकांचा समावेश आहे. वर्ष २०१६-१७ करिता प्रा.सत्यजित साळवे (कार्यक्रम समन्वयक,कबचौउमवि,जळगाव ) यांना कार्यक्रम सन्वयक प्रशंसा प्रमाणपत्र पुरस्कार, डॉ.सचिन नांद्रे (उत्तमराव पाटील महाविद्यालय, दहिवेल)यांना कार्यक्रम अधिकारी प्रशंसा प्रमाणपत्र पुरस्कार, पुजा चावडा (आर.एफ.एन.एन.एस. वरिष्ठ महाविद्यालय, अक्कलकुलवा, जि. नंदुरबार) हिस सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार जाहिर झाला आहे. वर्ष २०१८-१९ करिता सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार धुळे येथील डॉ.पी.आर.घोगरे विज्ञान महाविद्यालयास प्राप्त झाला आहे तर याच महाविद्यालयातील डॉ.दत्ता ढाले यांना कार्यक्रम अधिकारी प्रशंसा प्रमाणपत्र पुरस्कार आणि कांचन चव्हाण (समाजकार्य विभाग, कबचौउमवि, जळगाव ) या विद्यार्थीनीस सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार जाहिर झाला आहे. वर्ष २०१९-२० करिता डॉ.निलेश पवार (प्रताप महाविद्यालय, अमळनेर) यांना कार्यक्रम अधिकारी प्रशंसा प्रमाणपत्र पुरस्कार तर आकाश धनगर (समाजकार्य विभाग, कबचौउमवि, जळगाव ) यास सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार जाहिर झाला आहे. वर्ष २०२०-२१ करिता प्रतिक कदम (जी.टी.पी.महाविद्यालय, नंदुरबार) यास सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार जाहिर झाला आहे. सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्काराचे स्वरुप स्मृतिचिन्ह व रुपये दोन हजार असे आहे अशी माहिती विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ.सचिन नांद्रे यांनी दिली.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी